॥ श्री.स्वामी समर्थ ॥

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

## अहिल्यानगर जिल्हा सचिव : श्री.सुरेश काशिनाथ खोसे पाटील

* ई-मेल sureshkhose88@gmail.com मोबा -८७८८१६८२७५/९८९०३९१३५०

म.रा.प. संघ /रस्ता/ २०२४ दि. 3 सप्टेंबर २०२४

प्रति,

मा. खा. डॉ. निलेशजी लंके सो.

पारनेर.

विषय - निघोज खालची लाळगे मळा चाटी रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरण होणेबाबत.

मोले,

हा रस्ता हायस्कुल शाळेच्या मुलांना अतिशय जवळचा व सुरक्षित असुन या रस्त्याने अनेक शाळकरी मुले जातात. पण सध्या पावसाळा सुरु असल्याने पायी चालणे मुश्किल आहे, अनेक मुले घसरुन पडतात, जखमी होता... सायकली गाळात अडकतात. परिणामी त्यांना मुख्य रस्ता असलेल्या एस.टी. स्टॅण्ड परिसरातून शाळेला जावे लाग... पण या रस्त्याने वाहनांची फार वर्दळ असल्याने अप... होतात. अनेक मुले जखमी होतात. रस्त्याबरोबर गटार लाई... काम होणेबाबत. तरी मा. खा. लंके साहेब आपण स्वतः जातीने लक्ष देवून हा १२०० मिटरचा रस्ता सिमेंट कॉंक्री... करण करुन द्यावा, ही विनंती.

आपले सहकार्याबद्दल धन्यवाद.

आपला

श्री सुरेश काशिनाथ खोसेपाटील
वार्ताहर - दै.पुण्य नगरी, दै.लोक आवाज
"लावण्य आयुर्वेदालय,"
निघोज, ता.पारनेर
मो.क्र.८७८८१६८२७५/९८९०३९१३५०

पारनेर

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१
नारायणगांव, ता.जुन्नर,जि-पुणे.

जा.क्र/कुपावि-१/प्रशा-२/ ५४९९ /सन-२०२१ दिनांक : ०१/०९/२०२१

प्रति,

सरपंच,
ग्रुप ग्रामपंचायत, निघोज,
ता.पारनेर, जि.अहमदनगर.

विषय :- निघोज येथील कुकडी डावा कालव्याची सेवा पथाचा (चारी रस्ता) दुरुस्ती व वापरास परवानगी मिळणे बाबत.

संदर्भ :- १) आपले कार्यालयीन दिनांक ०३/०८/२०२१ रोजीचे पत्र.
२) उपविभागीय अधिकारी, पिंपळगांव जोगे पाटबंधारे उपविभाग, अळकुटी यांचे पत्र जा.क्र.पिंजोपाउवि/प्रशा/३९०/दिनांक २७/०८/२०२१.

उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये ग्रामपंचायत निघोज यांनी खालील वितरीका व लघु वितरीका वरील रस्त्याची दुरुस्ती करण्यांस परवानगी मागितलेली आहे.

१) वितरीका क्र.२ वरील ७५० मी.लांबीच्या रोडची दुरुस्ती करणे.
२) कुकडी डावा कालव्याची वितरीका क्र.२२ च्या सेवा पथाचा रस्ता दुरुस्ती व कॅनॉल रोड ते खाण्याबा मळा (गाडीलगाव रोड) दुरुस्त करणे.
३) वितरीका क्र.DY२ कॅनॉल रोड ते सुलाखेवाडी व ढवणवाडी पर्यंत रस्ता दुरुस्त करणे.
४) वितरीका क्र.२१ कॅनॉल रोड ते कुकडी नदी पर्यंत रस्ता दुरुस्त करणे.
५) वितरीका क्र.२० कॅनॉल क्र.२० कॅनॉल रोड ते शिवपवाडी पर्यंत रस्ता दुरुस्त करणे.

त्या अनुषंगाने उपविभागीय कार्यालयाचा संसदर्भिय पत्र क्र.२ अन्वये क्षेत्रिय अहवाल या कार्यालयात प्राप्त झाला आहे. वितरीका/लघु वितरीकांच्या सेवापथाच्या बाजुचा वापर शेतकरी करत आहेत. सदर रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कालव्याच्या सेवापथाच्या बाजुला रस्ता मजबुतीकरण/खडीकरणास खालील अटींच्या अधिन राहुन परवानगी देण्यांत येत आहे.

१) सदर रस्ता फक्त हलक्या वाहतुकीसाठीच वापरता येईल.
२) सदर रस्त्याचे आपले कार्यालयामार्फत खडीकरण केल्यानंतर पुढील देखभाल, दुरुस्तीची कामे आपले कार्यालयानेच करणे आवश्यक आहे.
३) सदर रस्त्याची दुरुस्ती करतांना कालव्याचे मातीकाम, बांधकामाचे नुकसान व कालव्याच्या आवर्तनास बाधा येणार नाही याची दक्षता घ्यावी.
४) रस्त्याचे कडेला कालवा हद्दीत कचरा टाकुन कालव्याचे पाण्याचे प्रदुषण होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.
५) सदर रस्त्याचे काम करतांना या कार्यालयास अवगत करुन संबंधित शाखाधिकारी यांचे देखरेखीखाली करणे आवश्यक आहे.
६) सदर रस्त्याचे काम आपले कार्यालयाने केले तरी सदर रस्त्याची मालकी जलसंपदा विभागाचीच राहील.
७) सदर सेवा पथावरुन वाहतुक करतांना अपघात झाल्यास त्यास जलसंपदा विभाग जबाबदार राहणार नाही.

हे आपले माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

उपकार्यकारी अभियंता
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१,
नारायणगांव

स्थळ प्रत का.अ.यांना मान्य असे.

E:\USB Drive\pajade\आस्थापना\अळकुटी उपविभाग\प्रकल्प शाखा\सेवापथ दुरुस्ती.docx

Scanned with CamScanner